## नियमित दिवाणी दावा क्र. ९०/२०१९
## (CNR NO.:MHRT050010552019)
## (पद्माकर लक्ष्मण उकार्डे वि. श्रीधर चव्हाण)
## निशाणी क्र. २५ वरील आदेश

१. सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे वादी यांनी दावा जमिन मिळकतीचा तपशिल दिला आहे. जमिन मिळकतीमध्ये असणा–या घराच्या संदर्भात दावा आहे. दावा दाखल करताना दावा कलम १ मध्ये सदर मिळकतीचा नंबर हा सि.स. नंबर १९५६ व २९५७ असा नमूद झाला आहे. परंतु प्रत्यक्षात १९५६ या ऐवजी सदर मिळकतीचा नंबर हा २९५६ असा आहे. सदरची बाब ही नजरचुकीने व टायपिंग दोषामुळे झाली आहे त्यामुळे दुरुस्ती करणे भाग पडले आहे. सदरची दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असून त्यामुळे दाव्यात कोणताही बदल होणार नाही. सदरच्या दुरुस्तीस परवानगी न दिल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे दावा कलम १ मध्ये नमूद १९५६ च्या अंकातील १ हा अंक खोडून त्याजागी २ हा अंक लिहून दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो कायद्यातील तत्त्वानुसार नाही त्यामुळे तो फेटाळण्यात यावा असे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे.

४. दोन्ही बांजुचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जाचे निर्गतीकरीता पुढील मुद्दे माझे विचाराधीन निघतात. ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रस्तुत अर्जात मागणी करत असलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करून मिळणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करणेत येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ व २ करीताः–</u>**

**५.** अर्ज, म्हणणे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचा मोकळा व खुला कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकत ही भुमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक १८८/अ१अ१ब या जमिन मिळकतीवरील घर क्रं.१७/२५(नविन घर क्रं. २५४००००२१) मधील रुम नं.२ अशी आहे. सदर मिळकतीस खेड सिटी सर्व्हे नंबर देण्यात आले आहे. वादीतर्फे वकील श्री. शेठ यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे सिटी सर्व्हे नंबर हा दाव्यामध्ये नमुद करताना टंकलेखन चुकीमुळे २९५६ ऐवजी १९५६ असा नमुद झाला आहे. मुळात सदरचा नंबर हा सिटी सर्व्हे क्र. २९५६ असा आहे. सदर कथनांचा विचार करता तसेच वादीचे दाव्यातील परिच्छेद क्र.१ चे अवलोकन करता त्यामध्ये जमिन मिळकतीस खेड सि.स नं. १९५६ व २९५७ असे नमूद केले असल्याचे दिसून येते. वादीच्या घराबाबत दाद मागत आहेत ते घर हे दावा जमिन मिळकतीवर स्थित आहे. दावा जमिन मिळकतीचा खेड सि.स नं. २९५६ असल्याने तशी दुरुस्ती करणे त्यांना भाग पडले असल्याचे दिसून येते.

**६.** दाव्याची परिणामकारक सुनावणी झालेली नाही. प्रस्तुत अर्जामध्ये मागितलेली दुरूस्ती पाहता सदरची चुक ही केवळ टायपिंग दोषाने झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीने सदरची कथने शपथेवर केली आहेत तसेच सदर कथनांच्या शाबितीची जबाबदारी ही वादीवरच राहणार आहे. प्रस्तावित दुरुस्ती नाकारलेस वादींचे पैशाचे स्वरूपात कधीही भरून न येणारे नुकसान होणारे आहे, त्यामुळे दोन्ही पक्षकारातील वाद हे अंतिमतः गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती ही संयुक्तीक व योग्य वाटते. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. सदरची दुरूस्ती तांत्रीक स्वरूपाची आहे, त्यामुळे दाव्याचे स्वरूपात कोणतेही बदल होणार नाहीत. प्रस्तुत दुरूस्ती करण्यास वादी यांना परवानगी दिल्यास सदरचा दावा गुणदोषावर

चालुन योग्यप्रकारे दोन्ही पक्षकारांना न्याय मिळेल. त्याचप्रमाणे भविष्यातील तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी वादी यांचा सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. परंतु त्याच बरोबर वादी यांनी एवढया दीर्घ कालावधीनंतर सदरचा अर्ज दाखल केला व त्यामुळे सदरचे काम प्रलंबित राहिले याकरीता वादी यांना कॉस्ट करणे उचित राहिल. सबब मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## **आदेश**

१. अर्ज (नि.२५) हा रक्कम रु.२००/– (रु. दोनशे मात्र) इतकी कॉस्ट प्रतिवादी क्र.१ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्जात नमुद केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत कॉस्ट रक्कम दिल्यानंतर करावी.

३. सदरची दुरूस्ती केल्यानंतर दाव्यामध्ये दुरूस्त प्रत या न्यायालयास व पर्यायाने विरुध्द पक्षास पुरविणेची आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2024.08.02 16:15:46 +0530

**दि. ०१/०८/२०२४** **(मनिषा म. पाटील)**

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खेड.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou.S.K.Inamdar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC Court, Khed |
| Date of Decision | : | 01.08.2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 02.08.2024 |
| Order uploaded on | : | 02.08.2024 |